नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,

डॉ पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, परभणी भारत मौसम विभाग

ईमेल - mahapocra@gmail.com, gkmparbhani@yahoo.com

परभणी कृषि हवामान सल्ला शुक्रवार, दिनांक – २७. ११.२०२०

हवामान घटक	हवामान अंदाज (दिनांक २८ नोव्हेंबर ते २ डिसेंबर, २०२०)				
दिनांक	२८/११	२९/११	३०/११	०१/१२	०२/१२
पाऊस (मिमी)	०.०	०.०	०.०	०.०	०.०
कमाल तापमान (अं.से.)	३०.०	३१.०	३३.०	३२.०	३२.०
किमान तापमान (अं.से.)	१६.०	१६.०	१६.०	१५.०	१४.०
ढग स्थिती (आकाश)	ढगाळ	स्वच्छ	स्वच्छ	अंशतः ढगाळ	ढगाळ
सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)	६५	६९	६१	५५	५६
दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	३९	४८	३९	३५	२७
वा-याचा वेग (किमी / तास)	११	७	८	६	५
वा-याची दिशा	ईशान्य	पूर्व	पूर्व	पूर्व	पूर्व

हवामानाचा इशारा	जिल्हयात पुढील पाच दिवस आकाश स्वच्छ ते ढगाळ राहील तसेच वाऱ्याचा वेग जास्त राहण्याची शक्यता आहे. .	
पिकांचे नाव	अवस्था	कृषि हवामान सल्ला
कापूस	वेचणी अवस्था	कुठल्याही परिस्थितीत कापसाची फरदड (खोडवा) घेऊ नये. कापूस पिकाची शेवटची वेचणी पूर्ण झाल्यावर कापूस पिकाचा पालापाचोळा, पराटया जमा करून त्यांची योग्य ते विल्हेवाट लावावी.
तूर	फुले लागणे ते शेंगा वाढीची अवस्था	तूर पिकात अळ्यांचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी क्विनॉलफॉस २५ % २० मिली किंवा इमामेक्टीन बेन्झोएट ५ % ४.४ ग्राम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पाण्याच्या उपलब्धतेनुसार पाणी व्यवस्थापन करावे.
रब्बी ज्वारी	वाढीची अवस्था	उगवण झालेल्या रब्बी ज्वारी पिकावर लष्करी अळीचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास याच्या व्यवस्थापनासाठी थायामीथोक्झाम १२.६ % + ल्यामडा सायहालोथ्रीन ९.५ झेडसी ५ मिली किंवा स्पिनेटोरम ११.७ एससी ४ मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.
गहू	पेरणी अवस्था	उशीरा बागायती गहू पिकांची पेरणी १५ डिसेंबर पर्यंत करता येते. उशीरा बागायती गहू पिकांच्या पेरणीसाठी निफाड-३४, एचडी-२५०१, एचडी-२८३३ किंवा समाधान या वाणाची निवड करावी. उशीरा बागायती गहू पिकांच्या पेरणीसाठी ८०:४०:४० किलो नत्र, स्फुरद व पालाश खताची शिफारस आहे त्यापैकी पेरणी वेळी अर्धे नत्र व पूर्ण स्फुरद व पालाश खत मात्रा द्यावी.
ऊस	वाढीची अवस्था	ऊस पिकावर रसशोषन करणा-या किडींचा (पांढरी माशी, पाकोळी) प्रादुर्भाव दिसून येत आहे याच्या व्यवस्थापनासाठी क्लोरपायरीफॉस २०% ३० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पावसाने उघाड दिल्यास फवारणी करावी.
केळी	वाढीची अवस्था	केळी बागेत सिगाटोगा रोगाच्या व्यवस्थापनासाठी प्रोपीकोनाझोल १० मिली + स्टिकर प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. केळी बागेत तणाचे नियंत्रण करावे. केळी बागेत झाडांना मातीचा आधार देऊन पाणी व्यवस्थापन करावे.

द्राक्षे	फुले लागणे अवस्था	आवश्यकतेनुसार द्राक्षे बागेत पाणी व्यवस्थापन करावे. द्राक्षे बागेत जीए३ @ १० मिली ग्राम प्रती लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. सध्या ढगाळ वातावरण असल्यामुळे द्राक्षे बागेत रोगाचा प्रादुर्भाव दिसून येत असल्यास त्यांचे व्यवस्थापन करावे.
फुल शेती	काढणी अवस्था	पुनर्लागवड केलेल्या फुल पिकात तण व्यवस्थापन करून पाणी व्यवस्थापन करावे.
भाजीपाला	पुनर्लागवड	पुनर्लागवड केलेल्या भाजीपाला पिकात तण व्यवस्थापन करून पाणी व्यवस्थापन करावे. भाजीपाला पिकात पाणी व्यवस्थापन करत असताना पिकात पाणी साचणार नाही यांची काळजी घ्यावी.
चारा पिके	वाढीची अवस्था	रब्बी हंगामात ज्वारी या चारा पिकाच्या लागवडीसाठी रूचीरा आर-४-११, मालदांडी-३५-१, निळवा, एमपी चारी, पुसा चारी, आय एस ४७७६, एएसजी –१४ किंवा एमकेव्ही चारी या वाणांपैकी एका वाणाची निवड करावी.
तुती रेशीम उदयोग	--	वातावरणातील बदल, ढगळ हवामानात रेशीम कीटक संगोपनगृहातील तापमान २० अंश च्या खाली असेल तर कीटक तुती पाने खात नाहीत तसेच २५ ते २८ सें. मर्यादित ठेवण्यासाठी संगोपनगृहात कोळसा शेगडी किंवा इलेक्ट्रीक रूम हिटरचा वापर करावा. तरच रेशीम कीटक तुती पाने खारतात व त्यांची चांगली वाढ होते. तापमान मर्यादित ठेवण्या बरोबर आद्रता ८०-८५ % ठेवण्यासाठी ह्युमिडी फायर चा वापर करावा म्हणजे चांगले कोषाचे उत्पादन वाढ होईल.

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली असून नानाजी देखमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.